# रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ (एमएसएसयू)

## शोध-सह-निवड समितीमार्फत कुलगुरू पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत

रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ (आरटी-एमएसएसयू) हे महाराष्ट्रातील शासनाने स्थापन केलेले पहिले कौशल्य विद्यापीठ असून, कौशल्याधारित दृष्टिकोनातून उच्च शिक्षणाची नव्याने व्याख्या करत आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी (एनईपी) सुसंगत असलेले आरटी-एमएसएसयू शैक्षणिक अध्ययनाची सांगड प्रत्यक्ष प्रशिक्षणाशी घालून उद्योगक्षेत्रासाठी सुसज्ज व रोजगारक्षम पदवीधर घडविते. प्रमाणपत्र, पदविका किंवा पदवीपर्यंत नेणाऱ्या लवचिक प्रवेश व निर्गम पर्यायांद्वारे आरटी-एमएसएसयू सुलभ, व्यावहारिक व विद्यार्थीकेंद्रित शिक्षण सुनिश्चित करते. नोकरीवर आधारित प्रशिक्षण (ओजेटी), कार्यक्षमता-आधारित मूल्यमापन आणि उद्योगक्षेत्राशी भक्कम भागीदारी यांसारख्या प्रारूपांद्वारे एमएसएसयू विद्यार्थ्यांना वास्तविक जगाशी सुसंगत कौशल्ये प्रदान करते — कारण आरटी-एमएसएसयू येथे 'कौशल्य हीच शक्ती' (Skill is Power) आहे. सदर विद्यापीठाची स्थापना सन 2021 मध्ये महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ अधिनियम, 2021 (महाराष्ट्र अधिनियम क्रमांक सात, 2021) अन्वये करण्यात आली असून, भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद 348 च्या खंड (3) च्या अनुषंगाने सदर अधिनियम दिनांक 23 मार्च 2021 रोजी "महाराष्ट्र शासन राजपत्रा"त प्रसिद्ध करण्यात आला आहे. विद्यापीठाबाबत अधिक तपशील विद्यापीठाच्या **https://www.mssu.ac.in** या संकेतस्थळावर पाहता येतील.

राज्य शासनाने महाराष्ट्र अधिनियम क्रमांक सात, 2021 म्हणून प्रख्यापित केलेल्या महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ अधिनियम, 2021 (राज्यपालांची अनुमती प्राप्त झाल्यानंतर दिनांक 23 मार्च 2021 रोजी "महाराष्ट्र शासन राजपत्रा"त प्रथम प्रसिद्ध, महाराष्ट्र अधिनियम क्रमांक तेहतीस, 2024 सह वाचावा) अन्वये कुलगुरू निवडीसाठी पारदर्शक प्रक्रिया विहित करण्यात आली आहे. सदर प्रक्रियेचा उद्देश असा आहे की, कौशल्याधारित शिक्षण, रोजगारक्षमताधारित शिक्षण किंवा उद्योजकता प्रोत्साहन या क्षेत्रात सिद्ध अनुभव असलेली, विद्यापीठात कार्य केलेली व डॉक्टरेट पदवीधारक असलेली, स्वतःच्या उदाहरणाद्वारे नेतृत्व सिद्ध करण्यास सक्षम, दूरदृष्टी प्रदान करण्यास सक्षम आणि विद्यार्थी व समाजहितार्थ ती दूरदृष्टी प्रत्यक्षात आणण्याची क्षमता असलेली, तसेच विद्यापीठाचे रूपांतर शैक्षणिक व व्यावसायिक उत्कृष्टता केंद्रात करण्यास सक्षम अशी एक प्रतिष्ठित शिक्षणतज्ज्ञ व उच्च दर्जाची प्रशासक व्यक्ती निवडणे, हा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल व या विद्यापीठाचे कुलपती महामहीम यांनी या विद्यापीठाच्या कुलगुरू पदासाठी योग्य नावांची शिफारस करण्याकरिता चार सदस्यीय शोध-सह-निवड समिती गठित केली आहे. सदर शोध-सह-निवड समिती आता महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ अधिनियम, 2021 च्या कलम 12(3)(फ) अन्वये (महाराष्ट्र अधिनियम क्रमांक तेहतीस, 2024 सह वाचता) विहित केलेली अर्हता व अनुभव पूर्ण करणाऱ्या आणि हे आव्हानात्मक पद स्वीकारण्यास इच्छुक असलेल्या प्रतिष्ठित शिक्षणतज्ज्ञांकडून कुलगुरू पदासाठी अर्ज/नामांकने मागवीत आहे. आवश्यक अर्हता व अनुभव तसेच अर्जाचा नमुना यांबाबतचा संपूर्ण तपशील, तसेच (i) सारांश पत्रक (ऑनलाईन भरून त्याची स्वाक्षरीयुक्त मुद्रित प्रत) (परिशिष्ट I) आणि (ii) ना-हरकत व दक्षता विषयक निष्कलंकता प्रमाणपत्र (परिशिष्ट II) हे सर्व विद्यापीठाच्या **www.mssu.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

इच्छुक व पात्र उमेदवार/अर्जदार यांनी विहित नमुन्यातील अर्जासोबत (i) सारांश पत्रक (परिशिष्ट-I), (ii) ना-हरकत प्रमाणपत्र (परिशिष्ट II) आणि (iii) दक्षता विषयक निष्कलंकता प्रमाणपत्र तसेच सर्व आवश्यक कागदपत्रे कालानुक्रमे मांडून (.doc व .pdf या स्वरूपात) अर्ज सादर करावा. याशिवाय, उमेदवारांनी पदासाठीच्या त्यांच्या उपयुक्ततेबाबत लेखी टिपण, विद्यापीठाबाबतच्या त्यांच्या दूरदृष्टीबाबत लेखी टिपण, तसेच तीन परीक्षकांची (अर्जदाराच्या कार्याशी चांगल्या प्रकारे परिचित असलेल्या मात्र सह-लेखक नसलेल्या मान्यवर व्यक्ती) आणि तीन शिफारसकर्त्यांची (अर्जदाराशी परिचित असून त्यांच्या कारकिर्दीत योगदान दिलेल्या व्यक्ती) नावे व संपर्क तपशील शिफारसपत्रांसह सादर करावेत. संस्थादेखील या

पदासाठी योग्य उमेदवारांचे नामांकन करू शकतात. तथापि, अशा सर्व उमेदवारांना विहित नमुन्यात त्यांचा बायोडाटा (CV) आवश्यक कागदपत्रांसह पाठविणे बंधनकारक राहील.

शोध-सह-निवड समितीने प्रा. अविनाश सी. पांडे, संचालक, आंतरविद्यापीठ प्रवेगक केंद्र (IUAC), नवी दिल्ली, यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.

नामांकने/अर्ज विहित नमुन्यात प्रत्यक्ष प्रतींमध्ये (4 प्रती) डाकेने/कुरिअरने, लखोट्यावर "**कुलगुरू पदासाठी अर्ज, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ**" असे स्पष्टपणे नमूद करून, तसेच त्याची सॉफ्ट कॉपी खालील पत्त्यावरील नोडल अधिकारी यांच्याकडे दिनांक **14 सप्टेंबर 2026** पर्यंत पोहोचेल अशा रीतीने पाठवावी. *त्यानंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.*

नोडल अधिकारी यांचे नाव व पत्ता :

प्रा. अविनाश सी. पांडे
निदेशक
अन्तर्विश्वविद्यालय त्वरक केन्द्र (IUAC)
अरुणा आसफ अली मार्ग, नवी दिल्ली – 110067
संपर्क क्रमांक: +91-11-24126036
ईमेल: nodalofficer.mssuvc2026@iuac.res.in
प्रत (CC): nodalofficer.mssuvc2026@gmail.com

आवश्यकता भासल्यास, अंतिम यादीत निवड झालेल्या उमेदवारांना शोध-सह-निवड समितीसमवेत प्रत्यक्ष मुलाखतीसाठी आमंत्रित केले जाईल. तथापि, केवळ किमान अर्हता पूर्ण केल्याने उमेदवाराला मुलाखतीसाठी बोलाविले जाण्याचा हक्क प्राप्त होत नाही.

या प्रतिष्ठित उच्च शिक्षण विद्यापीठाला अधिक उंचीवर नेण्यासाठी मान्यवर शिक्षणतज्ज्ञांसाठी ही एक उत्तम संधी आहे.

स्थळ : मुंबई
दिनांक : 13 ऑगस्ट, 2026

**अध्यक्ष**
**शोध-सह-निवड समिती**